महत्वाचे

जा.क्र.उमाशि-१/पुवि/ऑनलाईन प्रवेश/२०१५-१६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 16 APR 2015

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य,
माध्यमिक विद्यालये / माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका व कटक मंडळ क्षेत्र,
पुणे.

**विषय :- इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१५-१६**

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावरील उच्च माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालयांधील इयत्ता ११ वी चे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील प्रवेश गतवर्षीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत.

याबाबत कळविण्यात येते की आपल्या माध्यमिक विद्यालयातील इ.१० वी वर्गातील विद्यार्थी संख्येएवढी इ.११ वी आनलॉईन प्रवेशाची माहितीपुस्तिका (लॉगिन आयडी पासवर्डसह) विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी आपल्या शाळेकरीता निश्चित केलेल्या खालील केंद्रावर दि.२१.०४.२०१५ पूर्वी लेखी मागणी नोंदवायची आहे व **त्यावरूनच एकत्रित पुस्तिका छपाईची संख्या निश्चित करण्यात येणार आहे**, याची नोंद घ्यावी.

१. **नूमवि (मुलांचे) कनिष्ठ महाविद्यालय, बुधवार पेठ, पुणे-२**
२. **कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, बाबाजन चौक, कॅम्प, पुणे-१**
३. **श्रीमती गोदावरी हिंदी विद्यालय, चिंचवड, पुणे-१९**
४. **गुरूकुल स्कूल, विद्यापीठ रोड, पुणे (सीबीएसई बोर्ड विद्यार्थ्यांसाठी)**
५. **ह्यू मॅक हेंद्री स्कूल, सॅलिसबरी पार्क, पुणे (आयसीएसई विद्यार्थ्यांसाठी)**
६. **एकुण नऊ केंद्र प्रमुखांची कनिष्ठ महाविद्यालये (अन्य बोर्डाचे विद्यार्थी व पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील विद्याथ्यांसाठी)**

सदर माहितीपुस्तिका रूपये १००/- प्रमाणे फक्त आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना वितरित करावयाची आहे. आवश्यकतेपेक्षा जास्त पुस्तिका वाटप केंद्रातून प्राप्त करून घेऊ नये. तसेच घेतलेल्या पुस्तिका विद्यार्थ्यांना वितरित केल्यानंतर उर्वरित पुस्तिका तात्काळ वरील केंद्रावर जमा कराव्यात. आपणाकडून पुस्तिका ठराविक वेळेत परत न केल्यास त्याची किंमत आपणाकडून वसूल करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

तसेच आपल्या विद्यालयातील इ.१० वीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज आपल्या विद्यालयातून माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या संकेतस्थळावर भाग १ व भाग २ या स्वरूपात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे तंतोतंत पालन करून भरावयाचे आहेत. त्यासाठी आपल्या विद्यालयातील एक तांत्रिक कर्मचारी / शिक्षक यांची नियुक्ती करून याबाबतची जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करण्यात यावी. याबाबत सदर तांत्रिक कर्मचारी / शिक्षकास काही शंका, समस्या निर्माण झाल्यास स्थानिक पातळीवर झोनप्रमुखांशी संपर्क साधून समस्यांचे निराकरण करावयाचे आहे. तसेच विद्यार्थी व पालक यांना सदर प्रवेश प्रक्रियेची परिपूर्ण माहिती देणे व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरणे यासाठी आपण आपल्या शाळेमध्ये उदबोधन वर्गाचे आयोजन करावे. यासाठी ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज आपल्या विद्यालयातून भरण्यात येतील अशा बाबतीत प्रतिविद्यार्थी रूपये २०/- एवढी रक्कम शाळेकडे ठेवून उर्वरित रक्कम बँक ऑफ महाराष्ट्र च्या 'इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे' च्या ६०१६५३०६१८२ या खाते क्रमांकावर जमा करावी. पुस्तिका वितरण केंद्रावरून घेतलेल्या माहिती पुस्तिका व केलेला बँक भरणा आर्थिकदृष्ट्या तंतोतंत जुळणे आवश्यक राहील, याची नोंद घ्यावी.

(बाळासाहेब ओव्हाळ)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
सहाय्यक शिक्षण संचालक
पुणे विभाग, पुणे-१

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव रवाना :-**

१. **प्राचार्य, नूमवि (मुलांचे) विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बुधवार पेठ, पुणे-२**

२. **प्राचार्य, कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, बाबाजन चौक, कॅम्प, पुणे-१**

३. **प्राचार्य, श्रीमती गोदावरी हिंदी विद्यालय, चिंचवड, पुणे-१९**

२/- आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त विषयान्वये गतवर्षीप्रमाणे आपल्या विभागातील सर्व माध्यमिक शाळांना इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाची माहिती पुस्तिकांची मागणीनुसार पुस्तिकांची नोंद करावी व या कार्यालयास एकुण पुस्तिका मागणी संख्या कळवावी. माहिती पुस्तिका उपलब्ध झाल्यानंतर तात्काळ संबंधित विद्यालयांना पोहोच घेऊन वितरित करावी.

4. **गुरूकुल स्कूल, विद्यापीठ रोड, पुणे**

5. **हयू मॅक हेंद्री स्कूल, सॅलिसबरी पार्क, पुणे**

6. **एकुण नऊ केंद्र प्रमुखांची कनिष्ठ महाविद्यालये**

(स.प.महाविद्यालय, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, शाहू कॉलेज, वसंतराव सणस कॉलेज, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, साधना कनिष्ठ महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय, जयहिंद कॉलेज, म्हाळसाकांत ज्युनियर कॉलेज, पुणे)